बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २६ | बुधवार, दि.५ जून २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघात तब्बल २५ वर्षांनी काँग्रेसचा खासदार

## ✻ भाजपच्या अंतर्गत गटबाजीचा सुनील मेंढेना फटका ✻ प्रफुल्ल पटेलांचा करिश्मा गायब; ✻ नानांची जादू चालली



**गोंदिया:-** भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघातून तब्बल २५ वर्षांनी काँग्रेसने आपल्या चिन्हावर निवडणूक लढवत भाजपच्या हातून खासदारकी आपल्याकडे खेचून आणली. काँग्रेसच्या डॉ. प्रशांत पडोळे यांनी भाजपच्या सुनील मेंढे यांचा तब्बल ३७ हजार ३८० मतांनी पराभव केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे हेविवेट नेते प्रफुल पटेल यांचा मतदार संघातच हा पराभव महायुतीच्या जिव्हारी लागला, हे मात्र निश्चित.

तुमसर, भंडारा, साकोली व अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाने पडोळेंना आघाडी दिली.तर मेंढे यांना गोंदियात ३५ हजाराची व तिरोडा मतदारसंघात ९ हजाराची आघाडी मिळाली. सुरुवातीपासूनच मेंढे आणि पडोळे यांच्यामध्ये अतितटीची लढत दिसली. पहिल्या काही तासामध्ये मेंढे हे काही मतांनी पुढे होते. नंतर डॉ.पडोळे यांनी आघाडी घेतली. आघाडी-पिछाडीचा हा खेळ बऱ्याच वेळापर्यंत सुरु होता. प्रत्येक टप्प्यावर कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून येत होता. भाजपचे उमेदवार सुनील मेंढे हे सकाळपासून मतमोजणी केंद्रावर होते. तर पडोळे हे सायंकाळी ४ नंतर मतमोजणी केंद्रावर पोहोचले. काँग्रेस व भाजपमधील बंडखोरीचा काहीच प्रभाव या निवडणुकीत झाला नसल्याचे दिसून आले.

विशेष म्हणजे बहुजन समाज पक्षाला यावेळी २५४६२ मतावरच समाधान मानावे लागले. गेल्या तीन निवडणुकीतील बसपला मिळालेली ही सर्वात कमी मते ठरली आहेत. तर वंचित आघाडीचे संजय केवट यांना २४८५८ मते मिळाली असून मागच्या निवडणुकीच्या तुलनेत कमी मते मिळाली. यावरुन यावेळी मतदारांनी संविधान वाचविण्याच्या मुद्दाला व बेरोजगारीच्या प्रश्नाला घेऊन मताचे विभाजन अधिक न करता ते काँग्रेस महाविकास आघाडीकडे वळते केल्याने भाजपला विजयापासून दूर रहावे लागले हे खरे आहे.

महाराष्ट्रात मागील दोन वर्षांत अनेक नाट्यमय घडामोडी घडून शत्रू पक्ष मित्र झाले तर मित्रपक्ष शत्रू झाल्याचे पहावयास मिळाले. त्यातच शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटिमुळे वातावरण अधिकच गढूळ झाले होते.भंडारा - गोंदिया लोकसभा मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून परंपरागतरित्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यात येत असल्याने या मतदार संघातून प्रफुल्ल पटेल निवडणूक लढवत होते. यावेळी मात्र प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात आल्याने व भाजप सोबत युतीत असल्याने या राष्ट्रवादी काँग्रेसच्या परंपरागत मतदार संघातून भाजपने सुनील मेंढे यांना उमेदवारी दिली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट भाजपला मिळाल्याने काँग्रेसने तब्बल २५ वर्षांनी पंजा या चिन्हावर निवडणूक लढविली. भंडारा - गोंदिया लोकसभा मतदार संघ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल यांच्यासाठी अतिशय प्रतिष्ठेचे बनले होते. त्यामुळे या मतदार संघाकडे अख्या राज्याचे लक्ष लागले होते. विशेष म्हणजे सदर मतदार संघ हा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांचा गृहजिल्हा असल्याने त्यात अधिकच रंगत आली होती. भाजपने यावेळी मतदार संघात खूप जोर लावून निवडणुकीत विजयासाठी जोरकस प्रयत्न केले. काँग्रेसच्या वतीने नानाभाऊ पटोले यांनी संपूर्ण धुरा हातात घेऊन आपली जादू या मतदार संघावर कायम असल्याचे दाखवून दिले.

भाजपचे गणित हे भाजपचे परंपरागत मतदार तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मतदारांवर अवलंबून होते. त्यामुळे विजयाचे गणित हे साहजिकच लाखाच्या वर जाणार असे भाजप कार्यकर्त्यांना वाटत होते. मात्र सुनील मेंढे यांना भाजपच्या अंतर्गत गटबाजी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मतदारांनी दाखविलेली पाठ यांचा फटका बसल्याचे बोलले जात आहे. त्याचप्रमाणे सुनील मेंढे यांना पक्षांतर्गत विरोध असतानाही त्यानांच उमेदवारी देणे भाजपला अती आत्मविश्वास नडला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

त्या तुलनेत मात्र २५ वर्षांनी पंजा हे चिन्ह या मतदार संघात आल्याने तसेच दलीत, मुस्लिम तसेच बहुजन मतदारांची साथ मिळाल्याने काँग्रेसने मात्र विजयी पताका फडकाविली.एकंदरीत वरच्या पातळीवर मोठ्या नेत्यांना आपल्या गळ्याला लावले की कार्यकर्ते आपल्या पाठीशी येतात, हा भ्रम मात्र या निवडणुकीत गळून पडल्याचे निवडणूक निकालावरून दिसुन येते.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतांनी निवडून आलेले व दुसऱ्यांदा रिंगणात असलेले भाजपाचे उमेदवार सुनील मेंढे यांना ५ लाख ५० हजार ३३ मते मिळाली. राजकारणात नवख्या असलेले काँग्रेस उमेदवार डॉ.प्रशांत यादवराव पडोळे यांनी ५ लाख ८७ हजार ४१३ मत घेऊन मेंढे यांचा ३७ हजार ३८० मतांनी पराभव करीत २५ वर्षानंतर हा लोकसभा मतदारसंघ काँग्रेसकडे परत मिळवून घेतला. त्यातच मतदारांच्या मनात देशातील विद्यमान केंद्रसरकार व खासदाराबद्दल असलेला रोष मतदानातून व्यक्त केल्याचे चित्र निकालानंतर बघावयास मिळाले. विशेष म्हणजे ही निवडणुक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी एकहाती घेतली होती. तर भाजपमहायुतीकडून राष्ट्रवादीचे नेते खासदार प्रफुल पटेल यांच्याकरीता महत्वाची होती. मात्र मतदारांनी भाजपसह महायुतीच्या घटक पक्षांना नाकारल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. पहिल्या फेरीपासून आघाडीवर असलेले भाजपचे सुनिल मेंढे मात्र नंतर पिछाडीवर गेले ते मोठी आघाडी घेऊ शकले नाही.



२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार सुनील मेंढे हे भंडारा-गोंदिया मतदारसंघातून विक्रमी मतांनी विजयी झाले आहेत. त्यांना एकूण ६,५०,२४३ मते मिळाली होती. त्यांच्या विरोधात उभे असलेले राष्ट्रवादीचे नाना पंचबुद्धे यांना ४,५२,८४९ इतकी मते मिळाली.भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाच्या मतमोजणीच्या सुरवातीपासूनच भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुनिल मेंढे यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार नाना पंचबुध्दे यांच्यावर घेतलेली आघाडी कुठेच कमी झाली नाही. सातत्याने ती वाढत १ लाख ९७ हजार ३८४ मतांनी विक्रमी विजय मिळविला आहे.हा विजय नाना पटोले यांच्यापेक्षाही मोठा होता.

विशेष म्हणजे गेल्या पोटनिवडणुकीत व २०१४ च्या निवडणुकीत सुध्दा ज्या ठिकाणी भाजप मागे होती, त्या मतदारसघातही आघाडी घेतली. तिरोडा विधानसभा मतदारसंघात दोन्ही निवडणुकीत पक्षाचा उमेदवार मागे होता. यावेळी मात्र प्रत्येक फेरीत याही मतदारसंघात आघाडी घेतली. तर गोंदिया विधानसभा मतदारसंघात असलेली आघाडी वाढविल्याने काँग्रेसचे विद्यमान आमदार गोपालदास अग्रवालासांठी ही धोक्याची घंटा ठरल्याने त्यांनी विधानसभा निवडणुकीत भाजप प्रवेश केला होता.

मोदी लाटेमुळे २०१४ मध्ये देशात भाजपचे सरकार स्थापन झाले होते. मात्र २०१९ च्या निवडणुकीत ही लाट कायम राहणार की चित्र बदलणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. या लोकसभा मतदार संघात नाना पटोले यांनी खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर २०१८ मध्ये पोटनिवडणूक झाली होती. त्यात भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे मधुकर कुकडे हे विजयी झाले होते. त्यामुळे या मतदारसंघात मोदी लाट नसल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातील पुन्हा एकदा भाजपच्या बाजुने कौल दिल्याने पाच वर्षानंतरही मोदी लाट कायम असल्याचे चित्र दिसून आले. नवमतदार हा पुर्णतःभाजपकडे वळल्याचे व जातीय फॅक्टर या निवडणुकीत कुठेच चालले नसल्याचे दिसून आले.

मेंढे यांचा राजकीय प्रवास पाहता काँग्रेसचे प्रशांत पडोळे हे नवखे उमेदवार होते. तर हे दोन्ही उमेदवार भंडारा जिल्ह्याचेच असल्याने या निवडणुकीत नेमकी बाजी कोण मारणार याकडे सुरूवातीपासूनच मतदारांचे लक्ष लागले होते. त्यातच २५ वर्षानंतर लोकसभा निवडणुकीत पंजा निवडणुक चिन्ह आल्याने ही निवडणुक कार्यकर्ते व नागरिकांनी डोक्यावर घेतली होती. पडोळेंच्या विजयासाठी माजी खासदार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांनी एकहाती सुत्रे हाती घेत मतदारसंघ पिंजून काढला. पडोळेकरीता काँग्रेसचे युवा नेते राहुल गांधी यांच्याशिवाय इतर कुठल्याही मोठ्या नेत्यांची सभा झाली नाही. याऊलट मेंढे यांच्या विजयासाठी गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष जे.पी.नड्डा, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ.परिणय फुके यांनी मतदारसंघात प्रचार सभा घेत झोकून घेतले होते.

### मतदार संघात २००४ पासूनची स्थिती

| सन | विजयी | पराभूत |
|---|---|---|
| २००४ | भाजप | राष्ट्रवादी |
| २००९ | राष्ट्रवादी | भाजप |
| २०१४ | भाजप | राष्ट्रवादी |
| २०१८ | राष्ट्रवादी | भाजप |
| २०१९ | भाजप | राष्ट्रवादी |
| २०२४ | काँग्रेस | भाजप |



### विजयानंतर जल्लोष कार्यकर्त्यांचा

**गोंदिया: भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघातून काँग्रेसचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे आघाडीवर असल्याचे कळताच ते मतमोजणी केंद्रातून बाहेर पडले. डॉ. पडोळे यांचा होणारा विजय बघून काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना त्यांना घेरून धरले व विजयाचा जल्लोष व्यक्त करीत त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. विद्यमान खासदार सुनील मेंढे यांना चांगल्या मताधिक्याने पराभूत केल्याने डॉ. पडोळे यांच्यासह कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसून येत होता.**

### सुनील मेंढे म्हणतात पराभवाचे आत्मचिंतन करणार



**लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर भाजपाचे उमेदवार सुनील मेंढे यांचा पराभव झाला. यावर प्रतिक्रिया देतांना त्यांनी निवडणुकीत नेमक्या आमच्याकडून कुठल्या चुका झाल्या, कुठल्या गोष्टीची सुधारणा करण्याची गरज आहे. आम्ही नेमके कुठे कमी पडलो याचे आत्मचिंतन करणार असल्याचे सांगितले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्त्व आणि केलेली विकास कामे, शेतकरी कर्जमाफी, शेतकरी सन्मान योजना तसेच भाजप सरकारने जनतेसाठी घेतलेले अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती मतदारांपर्यंत पोहचविण्याचे काम केले. तसेच प्रत्येक मतदारसंघाची जबाबदारी त्या मतदारसंघातील आपल्या पक्षाच्या आमदारावर सोपविली. यामुळे भाजपाच्या आमदारांनी सुध्दा निवडणुकी दरम्यान संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. यासर्व गोष्टी मेंढे यांच्या विजयासाठी महत्त्वपूर्ण असतानाही त्यांना विजय मिळविता आला नाही. विशेष म्हणजे सुनील मेंढे यांच्या निवडणूक प्रचारार्थ गृहमंत्री अमित शहा यांनी साकोली येथे जाहीरसभा घेतली. या सभेला सुध्दा मोठी गर्दी झाली होती. पण मतदारांचा कल बदलण्यात सभा अपयशी ठरली. त्यातच मेंढे यांच्याबद्दल पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यातील जाहीर नाराजी सुध्दा त्यांना भोवली, ज्याकडे पक्षाने दुर्लक्ष केले होते.

या निवडणुकीत काँग्रेस-राष्ट्रवादीचे नेते व कार्यकर्त्यांनी भरपूर कष्ट घेतले हे जरी खरे असले, तरी भाजपमधील दोन्ही जिल्हातील नेत्यांकडे बघितल्यास त्यांनी पाहिजे तसा प्रचार केलेला नव्हता.

**बसप,वंचितचा प्रभाव नाही**

बहुजन समाज पक्षाच्या उमेदवाराला २०१४ मध्ये जेवढी मते मिळाली तेवढीच मते २०१९ च्यानिवडणुकीतही मिळाल्याने बसपची वोटबँक ही स्थिरावल्याचे चित्र होते. मात्र यावेळी बसप व वंचितलाही ३० हजाराचा आखडा पार करता आला नाही. त्यातच माजी आमदार सेवक वाघाये यांनाही मतदारांनी नाकारल्याचे दिसून आले.

पोस्टल मतदानातही कर्मचारी वर्गाने काँग्रेसउमेदवाराला भरभरुन मतदान केले आहे.पडोळेंना ५७३५ तर मेंढेना ३८११ मते पोस्टलची मिळाली.

सर्वच विधानसभा मतदारसंघाचा विचार केल्यास तुमसर विधानसभा मतदारसंघात ९ हजार,भंडारा मतदारसंघात २३ हजार,साकोली विधानसभा मतदारसंघात २७ हजार व अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात २१ हजाराची आघाडी पडोळेंनी घेतली.तर सुनिल मेंढे यांना गोंदियात ३५ हजाराची व तिरोडा मतदारसंघात ९ हजाराची आघाडी मिळाली.विशेष म्हणजे गोंदियात २०१९ ला ३८ हजाराची व तिरोड्यात १८ हजाराची असलेली आघाडी यावेळी टिकवून ठेवता न आल्याने या मतदारसंघात महाविकास आघाडीला महायुतीमध्ये सुरंग लावण्यात यश आले असेच चित्र निकालातून दिसत आहे.



### माझा एकट्याचा नव्हे,तर जनतेचा विजय

**मताधिक्याने जनतेने आपणाला निवडून दिले,हा माझा नव्हे तर जनतेचा विजय आहे.महाविकास आघाडीतील सर्व मित्रपक्षातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तळमळीने काम केले.प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी उत्तम नियोजून आखून दिले.त्यामुळे विजयश्री मिळाली आहे.मागील १० वर्षात मतदारसंघात विकास कामाकंडे दुर्लक्ष करण्यात आले.बेरोजगारी,औद्योगीकरण,सिंचन,विज यासरखे प्रश्न सोडवण्यात खासदार अपयशी ठरले,त्यामुळे जनता त्यांच्यावर नाराज होती.ते प्रश्न सोडवण्याकरीता आपण प्रयत्न करणार आहोत.**

### भंडारा-गोंदिया मतदारसंघातील आतापर्यंत झालेले खासदार

- १९५१ : तुलाराम चंद्रभान साखरे
- १९५१ : चतुर्भूज जस्सानी
- १९५४ : अशोका मेहता
- १९५४ : भाऊदास बोरकर
- १९५७ : रामचंद्र हर्जनवीस
- १९५७ : बालकृष्ण वासनिक
- १९६२ : रामचंद्र हर्जनवीस
- १९६७ : अशोका मेहता
- १९७१ : ज्वालाप्रसाद दुबे
- १९७७ : लक्ष्मणराव मानकर
- १९८० : केशवराव पारधी
- १९८४ : केशवराव पारधी
- १९८९ : खुशाल बोपचे
- १९९१ : प्रफुल्ल पटेल
- १९९६ : प्रफुल्ल पटेल
- १९९८ : प्रफुल्ल पटेल
- १९९९ : चुन्नीलाल ठाकूर
- २००४ : शिशुपाल पटले
- २००९ : प्रफुल्ल पटेल
- २०१४ : नाना पटोले
- २०१८ : मधुकर कुकडे
- २०१९ : सुनील मेंढे
- २०२४ : डॉ.प्रशांत पडोळे


|| सेवा परमो धर्म ||

सेवा से संकल्प तक - संकल्प से सिद्धि तक

1. आपदा में किसानो को अधिक से अधिक मदत
2. किसानो को धान के बोनस के माध्यम से आर्थिक सहकार्य
3. धान खरेदी प्रक्रिया में अभूतपूर्व सुधार कर किया धान विक्री प्रक्रिया सरल
4. महिलाओ के बचत गटो को ग्रामीण व्यापार केंद्र बनाने हेतु हर गाव में महिला भवन का निर्माण
5. किसानो के लिए ग्राम पंचायत स्तर पर कृषी गोदाम का निर्माण
6. पीएम किसान सम्मान निधी योजना के समस्या निकरण कैंप के माध्यम से ५००० किसानो के समस्या निराकरण कार्य प्रगति पर
7. मनरेगा के माध्यम से ग्रामीण जनता को मिला रोजगार
8. सम्पूर्ण ग्रामीण क्षेत्र के सड़को का नुतनीकरण एंव मजबूतीकरण
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इनके सपनों को साकार करने गोंदिया तहसील के सभी प्रमुख गावों में होगा उच्च कोटी का वातानिकुलित वाचनालय एंव ग्रंथालय का निर्माण कार्य
10. शहरी दवाखाने (अर्बन PHC) का निर्माण कार्य पूर्ण
11. सभी जाती धर्म और पंथ के श्रद्धास्थानो का विकास कार्य
12. गोंदिया शहर में महानगर पालिका स्तर के रास्तो के निर्माण कार्य को मंजूरी
13. कई सालो से प्रलम्बित सिटी सर्वे का काम सुरु
14. गोंदिया की पहचान सुभाष गार्डन का नुतनीकरण कार्य प्रगति पर
15. डांगोरली बैराज के निर्माण से गोंदिया शहर के साथ सम्पूर्ण गोंदिया क्षेत्र की पीने के पानी के साथ खेती किसानी के लिए पानी की समस्या का होगा कायमस्वरूपी समाधान - जल्द ही होगा निर्माण कार्य शुरू
16. समृद्धि महामार्ग गोंदिया तक एक्सपांड करने मंजूरी.

पथ का अंतिम लक्ष्य नहीं है, सिंहासन चढ़ते जाना।
सब समाज को लिए साथ में, आगे ही बढ़ते जाना।

जनता की पार्टी चाबी संघटना



(जनता का सेवक)





## संपादकीय

# लोकशाही व्यवस्थेची बूज राखली

देशात निवडणुका लढल्या जातात, राजकीय पक्षांच्या विचारधारा समोर येतात, जाहीरनाम्यांमधून त्या व्यक्त होतात. त्यातून काही मतमतांतरे समोर येतात. हे सगळे सुरूच असते. मात्र या राजकीय खेळामध्ये लोकशाहीची हानी होणे योग्य नाही. तिची अस्मिता कायम राखायला हवी. या निवडणुकीने ही बाब प्रकर्षाने अधोरेखित केली आहे. यंदाचे निकाल अनेक चुकीचे तर्क खोडून काढणारे दिसत आहेत.

जागतिक पातळीवरील चर्चेचा आणि औत्सुक्याचा विषय ठरलेल्या भारतातील सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्याने एका सर्वात मोठ्या लोकशाही उत्सवाचे सूप वाजले असले तरी हे निकाल अनेक विचारांना आणि चर्चेला तोंड फोडणारे ठरत आहेत. यातील पहिली बाब म्हणजे निवडणुका हेच लोकशाहीचे सर्वात मोठे आणि महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. असे असताना यंदाच्या निवडणुकीतील रणात लोकशाही धोक्यात असल्याचे भासवून मोठ्या प्रमाणावर टीका करण्यात आली. अगदी निवडणूक आयोगावर, तेथील अधिकाऱ्यांवर तसेच आयुक्तांवर आणि त्यांच्या कार्यप्रणालीवर संशय व्यक्त करण्यापर्यंत अनेकांनी मजल गाठली. मतमोजणीच्या प्रक्रियेवर, त्याच्या वैधतेवरही प्रश्न उपस्थित केले गेले. ईव्हीएम मशीनवर संशय व्यक्त केला गेला. मात्र ताजी परिस्थिती या सर्व शंका-कुशंकांना भेदत लोकशाहीतल्या स्पष्ट विजयाचे प्रतीक आहे, असे म्हणावे लागेल. हा लोकशाहीचा परमोच्च विजय आहेच, खेरीज निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांच्या कार्याला मिळालेली ही सलामीही आहे. या निकालामुळे या स्वायत्त संस्थेला दूषणे देणाऱ्यांची तोंडे बंद झाली आहेत.

निकालासंदर्भात मतमोजणीच्या पूर्वसंध्येला सोशल मीडिया तसेच अन्य प्रसिद्धी माध्यमांमधूनही भीती पसरवण्यात आल्याचे निदर्शनास आले. मतमोजणीच्या दिवशी भयानक हिंसाचार होईल, मते मोजली जात असताना वीजपुरवठा बंद केला जाईल असे सांगत धास्ती वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र राजकीय वर्चस्व दाखवण्याच्या वा राखण्याच्या या अट्टहासामध्ये लोकशाही तत्त्वांवर चालणारी यंत्रणा आणि संस्थांना विनाकारण लक्ष केले जात होते. त्यांच्यावर चिखलफेक होत होती. थोडक्यात, रडीच्या या डावाने लोकशाही तत्त्वांना हानी पोहोचण्याचा धोका होता. देशात निवडणुका लढल्या जातात, राजकीय पक्षांच्या विचारधारा समोर येतात, जाहीरनाम्यांमधून त्या व्यक्त होतात. त्यातून काही मतमतांतरे समोर येतातः हे सगळे सुरूच असते.

मात्र या राजकीय खेळामध्ये लोकशाहीची हानी होणे योग्य नाही. तिची अस्मिता कायम राखली जायला हवी. या निवडणुकीने ही बाब प्रकर्षाने अधोरेखित केली. ताज्या निकालामध्ये मावळत्या केंद्र सरकारचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसल्याचे सत्यही सूर्यप्रकाशाइतके स्पष्टपणे समोर आले आहे. त्यामुळेच हे निकाल भारतातील लोकशाही पद्धतीवर, येथील व्यवस्थेवर, त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या परदेशी प्रसारमाध्यमांना मिळालेली एक सणसणीत चपराक आहेच; खेरीज ही निवडणूक एकतर्फी असून त्यात विरोधकांना आवाज उठवता येणार नाही, असे म्हणणाऱ्या देशातील शक्तींनाही मिळालेले चोख आणि सणसणीत उत्तर आहे.

या ताज्या निकालानंतर भाजपाचा नकाशा उलटा झाल्याचे चित्र दिसते. या पक्षाला दक्षिण भारतात स्थान नाही असे आतापर्यंतचे मत होते. मात्र आता हैदराबाद, आंध्र, तेलंगणा आदी राज्यांमध्ये भाजपाची कामगिरी उत्तम दिसते. उत्तरेकडची परिस्थिती बघता तिथे जाती-पातीवर आधारित राजकारणाचा जबर फटका बसला आहे, असे म्हणता येईल. अर्थातच ही मोठी आणि विचार करण्याजोगी बाब आहे. मात्र संपूर्ण देशाचा विचार करता भाजपाला २५५ ते २६० जागा मिळाल्या तर त्यांच्या उत्तम कार्यपद्धतीला आणि प्रशासनाला मिळालेली जनतेची पावती आहे, असे म्हणावे लागेल. त्याचबरोबर राजकीय स्थैर्याला मिळालेली ही पसंती असल्याचेही आपल्याला मान्य करावे लागेल. शेवटी प्रत्येक निवडणुकीमध्ये वेगळेपण असते. जागा कमी-जास्त होत असतात.

सगळ्या जागांवर एकाच राजकीय पक्षाचे वर्चस्व राहण्याजोगी परिस्थिती कधीच नसते. कोणी मोदींमुळे आम्ही सगळ्या जागा जिंकू असे म्हणेल, तर तीदेखील अतिशयोक्ती ठरेल. शेवटी तुम्ही एका व्यक्तीवर अपेक्षांचा किती भार टाकणार, हेदेखील पाहायला हवे. त्यामुळे हे ताजे निकाल म्हणजे ग्राऊंड लेव्हलवर प्रत्येकाला काम करावे लागणार असल्याचा संकेत आहे. याचा अर्थ यापुढे मोदींचा करिश्मा चालणार नाही असा होत नाही पण, आता कोणीही हातावर हात ठेवून बसणे पक्षाला परवडणारे नाही. मोदींना पुढे चाल द्यायची तर सगळ्यांचे पाठबळ गरजेचे आहे, हे या निकालांनी स्पष्ट केले आहे.

प्रत्येक देशामध्ये सबळ विरोधी पक्ष असणे गरजेचे असते. केवळ सत्तारूढ पक्ष ताकदवान होणे, हे चांगल्या लोकशाही यंत्रणेचे लक्षण असू शकत नाही. या धर्तीवर बघताही ताजे निकाल देशाची ही गरज भागवणारे दिसत आहेत. या निवडणुकीतून देशाला सक्षम विरोधी पक्ष मिळेल. मात्र त्यांच्यातील एकता वा एकवाक्यता टिकणेही तेवढेच गरजेचे आहे. त्यांच्यामध्ये एक खंबीर नेतृत्व पुढे येणे गरजेचे आहे, कारण अद्याप त्यांच्यामध्ये नेतृत्व कोण करणार, याबाबत स्पष्टता दिसत नाही. त्यामुळेच ही त्रुटी कमी होऊन विरोधकांनाही एक चेहरा, एक नेतृत्व, एक आवाज आणि एक धोरण शोधणे गरजेचे आहे. त्यांनाही पुढील काळातील आपली नीती स्पष्ट करावी लागणार आहे. याचे कारण म्हणजे आतापर्यंतच्या रणधुमाळीत मोदींवर टीका करणे, हेच त्यांचे धोरण वा पवित्रा राहिलेला दिसला. त्यांच्याकडून विकासाचे कोणतेही मॉडेल समोर मांडले गेलेले दिसले नाही. मात्र जबाबदार विरोधी पक्ष म्हणून काम करताना त्यांना ही गरज भासेल.

ताज्या निकालांमध्ये भाजपाला अपेक्षित असणारा वा प्रचाराच्या प्रारंभी दावा केला जाणारा "४०० पार'चा नारा पूर्णत्वास गेलेला दिसला नाही हे सत्य आहे. मात्र तब्बल दहा वर्षे सत्ता सांभाळल्यानंतरही त्यांना मिळालेल्या अवघ्या "इंडिया' आघाडीपेक्षा जास्त जागा नोंद घेण्याजोग्या आहेत. त्यामुळेच दोन टर्मनंतरही देशात प्रस्थापितांविरोधातील वारे नव्हते, असे म्हणावे लागेल. त्यांच्या तोडीचा दुसरा राजकीय पक्ष जेमतेम नव्वदीच्या घरात दिसत आहे. हा फरकही लक्षणीय म्हणावा लागेल. १९८४ नंतर भारतामध्ये कोणत्याही एका राजकीय पक्षाला सलग इतकी वर्षे सत्तेवर राहण्याची संधी मिळालेली नाही. त्यामुळेच दोन कार्यकाळात २७२ पेक्षा जास्त जागा मिळून आता त्यांना २५५ ते २६० जागा मिळत असतील, तर हीदेखील त्यांच्या विकासकामांना वा त्या विचारांना मिळालेली पसंतीची पावती आहे, असेच म्हणावे लागेल. थोडक्यात, काहींनी भाजपाला मते दिली नसतील, पण त्यांच्या विकास आराखड्याला मतांच्या माध्यमातून स्वीकृती वा पसंती दिल्याची शक्यताही मोठी आहे.

निकालाच्या पूर्वसंस्थेलाच नरेंद्र मोदींनी करुणानिधी यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त बरेच मोठे ट्वीट केलेले दिसले. या पार्श्वभूमीवर त्यांना डीएमकेच्या तामिळनाडूमधील जागांची मदत होते की नाही हे बघणेही महत्त्वाचे ठरेल. डीएमकेची ३० जणांची संपूर्ण फळी इंडिया आघाडीतून बाहेर पडली, तर चित्र बदलू शकते. ही मदत मिळाली तर एनडीए आघाडी विनासायास पुढे जाऊ शकते. खेरीज एनडीएची स्वतःची ताकदही कमी समजण्याचे कारण नाही. अर्थात भाजपा २७२ च्या खाली राहिल्याने त्यांना स्वतःच्या योजना, आराखडे कसे आणि कितपत राबवता येतील, हे येत्या काळात बघावे लागेल. कारण या पक्षाने नेहमीच आपली धोरणे अत्यंत आश्वासक आणि आक्रमक पद्धतीने समोर मांडली आहेत. मग ते विचार पायाभूत सुविधा, परराष्ट्र नीती, शेतकऱ्यांविषयीचे धोरण वा समान नागरी कायद्यासारख्या विविध कायद्यांसंदर्भात असले, तरी बहुमताच्या बळावर पूर्णत्वास नेण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये दिसून येत होता. किंबहुना, हीच शिदोरी गेली दहा वर्षे त्यांच्या कामी आली होती. मात्र आता काहींची मदत घ्यावी लागल्यास ते आपली ही धोरणे तेवढ्याच तीव्रतेने आणि वेगाने राबवू शकतील का, वा पुढे नेऊ शकतील का? हा प्रश्न आहे.

भाजपाचे सुमारे साठ जागांचे नुकसान हा उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रामध्ये बसलेल्या फटक्याचा परिणाम आहे. अर्थात महाराष्ट्रातील परिस्थिती बघता ही अपेक्षा होतीच. त्यामुळेच यात धक्का बसण्यासारखे काही नाही. मात्र विशेषतः हातून निसटलेल्या उत्तर प्रदेशातील ३० ते ३५ जागा त्रास देणार आहेत. कारण त्या मिळाल्या असत्या, तर कोणतीही तोशिस न पडता त्यांनी सत्ता स्थापन केली असती. खेरीज पश्चिम बंगालमध्येही त्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. याचा फटकाही फार मोठा म्हणावा लागेल.

**आशय अभ्यंकर,** राजकीय अभ्यासक

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# रुग्णांचा अद्यापही बैलगाडीतूनच प्रवास

## दळणवळणाच्या सुविधांचा अभाव; पावसाळ्यात सर्वाधिक हाल

**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील केशोरी परिसर शेवटच्या टोकावर आहे. या परिसरातील आदिवासी दुर्गम भागात समाविष्ट उमरपायली, दकोटोला, चिसटोला, खडकी, तिरखुडी, बलीटोला या अगावांना जाण्यासाठी चांगले रस्ते असले तरी दळणवळणाच्या साधनांचा अभाव आहे. या गावांतून आजारी रुग्णांना बैलगाडीच्या सहाय्याने नजीकच्या केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणावे लागते. ही गैरसोय टाळण्यासाठी आदिवासी गावांत स्वतंत्र आरोग्य सेवा उपलब्ध करुण देणे आवश्यक आहे.



या गावांमध्ये रस्ते विकास झाला, परंतु अजूनही परिवहन मंडळाची बस पोहोचली नाही, ही वास्तविकता आहे. महाराष्ट्र शासनाची शहर असो की खेडेगाव, त्या गावातील प्रत्येक घटकांपर्यंत आरोग्य सुविधा पुरविण्याची जबाबदारी आहे. त्यादृष्टीने प्रत्येक खेडेगावात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र आरोग्य कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करुन कार्यान्वित करणे गरजेचे आहे. मात्र याची अद्यापही शासन आणि लोकप्रतिनिधींनी दखल घेतली नाही. त्यामुळे अनेक समस्या कायम आहे. केशोरी परिसरातील उमरपायली, दकोटोला, डोंगरगाव, वारव्ही, आंभोरा, चिसटोला, खडकी, तिरखुडी,बैलीटोला या गावांत स्वतंत्र आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन कार्यान्वित करावे.

या गावांमध्ये आजाराचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामुळे नेहमी आरोग्य व्यवस्थेवर प्रश्न निर्माण होते. या परिसरात फक्त केशोरी प्राथमिक आरोग्य केंद्र असून दुसरे प्राथमिक आरोग्य केंद्र इळदा येथे मंजूर होऊन सुसज्ज इमारत निर्माण करण्यात आली आहे. परंतु ते प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यात आले नाही.

### एसटी बसचे दर्शन दुर्लभ

**शासनाने लोकसंख्येचा निकष लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र, उपप्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करुन आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली. परंतु उमरपायली, दकोटोला, डोंगरगाव, वारव्ही, आंभोरा, विसटोला, खडकी, तिरखुडी, बलीटोला या गावांसाठी दळणवळणाची साधने उपलब्ध होत नाही. त्यामुळे गंभीर आजारी रुग्णांना अजूनही बैलगाडीच्या सहाय्याने प्राथमिक आरोग्य केंद्र, केशोरी येथे आणावे लागत असल्याने आरोग्याची सम्या कायम आहे.**

### पदे रिक्तच

**या भागात दरवर्षी मलेरिया, डेंग्यू, कॉलरा या साथीच्या आजारांची समस्या निर्माण होते. त्याला थोडीफार भौगोलिक परिस्थिती कारणीभूत असली तरी या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण टाळण्यासाठी या गावांत स्वतंत्र आरोग्य कर्मचारी नियुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे. केशोरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त असल्यामुळे मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकत नाही. तरीही उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या भरोशावर या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा डोलारा सांभाळून आरोग्य सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला जातो.**

# खत गहाळ झाल्यानंतर कृषी केंद्रांच्या गोदामांची तपासणी

## आतापर्यंत ३०० कृषी केंद्रांची पडताळणी: परवाना रद्द तरी खताचा साठा

**गोंदिया:** रब्बी हंगामासाठी गोरेगाव आणि सडक अर्जुनीसाठी आलेला ९ हजार मेट्रीक टन खत या दोन्ही तालुक्यातील कृषी केंद्र संचालकांपर्यंत पोहोचले नसल्याची बाब उघडकीस आली. या गहाळ झालेल्या खतावरुन कृषी विभागावर टीकेचे सत्र सुरु झाल्यानंतर आता कृषी विभागाने जिल्ह्यातील कृषी केंद्र आणि त्यांच्या गोदामांची तपासणीची धडक मोहिम सुरु केली आहे. ही तपासणी करण्यासाठी एक बाहेरचे पथकसुद्धा तपासणीसाठी आले असल्याची माहिती आहे.



खरीप हंगामाला सुरुवात होण्यास दहा ते पंधरा दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याने शेतकऱ्यांनी खते, बियाणांचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, खरीप हंगामादरम्यान दरवर्षी मोठ्या प्रमाणात खताचा काळाबाजार केला जातो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी याला अद्यापही पूर्णपणे पायबंद लागला नाही. त्यातच रब्बी हंगामासाठी आलेले ९ हजार मेट्रीक टन खताचा हिशोब अद्यापही जुळत नसल्याचे चित्र आहे. हे खत गोरेगाव आणि सडक अर्जुनी तालुक्यातील कृषी केंद्र संचालकांपर्यंत पोहा-चले नाही. त्यामुळे हे खत नेमके गेले कुठे यावरुन कृषी विभागात खळबळ उडाली आहे. यावरुन कृषी विभागावर टीकासत्र सुरु झाल्यानंतर कृषी विभागाने पथक तयार करुन जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्र आणि त्यांच्या गोदामातील खताच्या साठ्याची तपासणी सुरु केली आहे. तर, बाहेरुन सुद्धा एक पथक आले असल्याची माहिती आहे. या पथकाने आतापर्यंत ३०० वर कृषी केंद्राची तपासणी केली आहे. या तपासणीदरम्यान अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याची माहिती आहे. पॉस मशी-नवरील खत विक्रीचे आकडे जुळत नसल्याची तर काही ठिकाणी कृषी केंद्राचा परवाना रद्द झाला असला तरी त्यांच्याकडे खताचा साठा आढळला आहे. तर, काही कृषी केंद्राचे परवाना केव्हाच रद्द झाला असला तरी ते अद्यापही खताची विक्री करीत असल्याचे आढळल्याची माहिती आहे. तर, काही कृषी केंद्र संचालकांकडे दिलेल्या खता-पेक्षा अधिक आढळल्याची माहिती आहे. यासंदर्भात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता कृषी केंद्रांची तपासणी सुरु असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला, पण अधिक माहिती देणे टाळले.

### ९ हजार मेट्रीक टन गेले कुठे!

**गोरेगाव व सडक अर्जुनी तालुक्यातील कृषी केंद्र संचालकांना रब्बी हंगामासाठी आलेले ९ हजार मेट्रीक टन खत नेमके गेले कुठे, यावरुन सध्या कृषी विभागात जोरदार चर्चा आहे. तर जिल्ह्यासाठी आलेल्या खतांची इतर जिल्ह्यात अधिक दराने विक्री करण्यात आल्याची माहिती आहे.**

### आठ-दहा दिवस चालणार मोहीम

**कृषी विभागाच्या पथकाच्या माध्यमातून जिल्ह्यातील कृषी केंद्रांची तपासणी केली जात आहे. ही तपासणी मोहीम नेहमीची असल्याचे कृषी विभागाकडून सांगितले जात असले तरी गहाळ झालेल्या ९ हजार मेट्रीक टन खताचा शोध घेण्यासाठी ही मोहीम राबविली जात असल्याची माहिती आहे.**

# गोरेगाव तालुक्यात पाण्याचा प्रश्न पेटला

**गोंदिया :** तलावांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील पालेवाडा येथे भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे.पाण्यासाठी महीलांची शेत शिवारातील भटकंती शासनाच्या विविध पाणी योजनांचा समाचार घेण्यासारखी आहे.९५ लाख खर्च करून केलेली जल जीवन मिशन योजना फफ़ेल ठरल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

जिल्हा परिषदेच्या वतीने जलजीवन मिशन मोहीम राबविण्यात येत आहे. जलजीवन मिशन योजने अंतर्गत पालेवाडा या गावात घरोघरी नळ कनेक्शन लावण्यात आले. मात्र ज्या ठिकाणी पाण्याच्या मुख्य स्त्रोतासाठी विहीर खोदली ती जागा चुकीची निवडल्याने जानेवारी महिन्यातच तेथील पाणी आटले. यासह गावातील बोरवेल देखील कोरड्या पडल्याने येथील महिलांना पाण्यासाठी दोन किलो मीटरची पायपीट करावी लागत आहे.तर पालेवाडा गावापासून अवघ्या ५ कि मी अंतरावर असलेल्या कलपाथरी मध्यम प्रकल्पावर पाण्याची योजना कार्यान्वीत करून पालेवाडावासियांची तहान भागवावी अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.



गोरेगाव तालुक्यात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गेल्या महिन्यापासून बिकट झाला आहे. अनेक गावांत पिण्याच्या पाण्याकरिता भटकंती सुरु आहे. असे असताना पाणीपुरवठा करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या जीवन प्राधिकरणाच्या नळयोजनेचे व्हॉल्व्ह लिकेज असल्यामुळे दिवसाकाठी हजारो लिटर पाणी खाली पडून तळे साचल्याचा प्रकार समोर आला आहे.कटंगी मध्यम प्रकल्पातून हलबीटोला मार्गे पाईप टाकून शहरात पाणी आणले जाते. यादरम्यान पाण्याचा दबाव राहावा याकरिता ९ एअरव्हॉल्व्ह लावण्यात आले आहेत. मात्र यातील अनेक व्हॉल्व्ह लिकेज आहेत. याची माहिती जीवन प्राधिकरण विभागाला देखील आहे. मात्र त्याच्या दुरुस्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले. परिणामी दिवसाकाठी हजारो लिटर पाण्याचा अवव्यय होत आहे.

बजाज शोरुम समोर असलेल्या व्हॉल्व्हमधून निरंतर पाणी वाहत आहे. त्यामुळे परिसरातील जा-गेला तळ्याचे स्वरुप प्राप्त झाले. परिसरात राहणाऱ्या नागरिकांना त्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. जानाटोला मार्गावरील व्हॉल्व्ह देखील अनेक दिवसांपासून लिकेज आहे. त्याकडे देखील दुर्लक्ष करण्यात आले आहे.

### ३९८ अंगणवाड्याही पाण्याची सोयीपासून वंचित

**जिल्ह्यातील १७२४ अंगणवाडीपैकी ३९८ अंगणवाडी केंद्रात अद्यापही पाण्याची सोय नसल्याचे समोर आले आहे. यामुळे चिमुकले तहान भागविण्यासाठी इतर धाव घेत असून सुविधांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे पालक बोलू लागले आहेत. आजघडीला जिल्ह्यात १७२४ अंगणवाडी केंद्र मंजूर आहेत. त्यापैकी काही अंगणवाड्या एकाच इमारतीत असून, काही अंगणवाड्यांची स्वतःची इमारत नसल्याने भाड्याच्या खोलीत सुरू आहेत.३९८ अंगणवाडी केंद्रामध्ये पाण्याची सोय नसल्याने चिमुकल्यांना इतर धाव घ्यावी लागत आहे.**

# लोकसहभागातून १५ पशुवैद्यकीय दवाखाने आयएसओ

**गोंदिया:** पशुवैद्यकीय दवखाने आयएसओ करण्यासाठी त्या दवाखान्याला सुसज्ज करणे आवश्यक असते. त्या दवाखान्यात ज्या-ज्या गोष्टीची गरज आहे. त्या-त्या पुरविणे आवश्यक आहे. शासन एकीकडे आयएसओ करा, अशी सुचना संबंधित यंत्रणेला देते. परंतु आयएसओ करण्यासाठी त्या दवाखान्यांना गरज असलेल्या वस्तू खरेदी करण्यासाठी पैसे देण्यासाठी हात आखडता करते. मात्र लोकसहभागातून जिल्ह्यातील १५ दवाखाने आयएसओ झाले आहे. त्यांना आयएसओ दर्जादेखील प्राप्त झाला आहे.



गोंदिया जिल्ह्यातील ८० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीवर अवलंबून असलेले लोक शेतीला जोडव्यवसाय म्हणून पशुपालन करतात. त्या पशुंचे संवर्धन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांना मदत केली जाते. परंतु पाहिजे त्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत होत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांना डांग्या व घटसर्प असे विविध आजार होतात. त्यामुळे जनावरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. सोबतच जनावरांना कत्तलीसाठी रवाना केले जात असल्याने जनावरांच्या संख्येत घट होत आहे.

### दवाखाने सुधारण्यावर दिला जातोय भर

**यासर्व बाबींवर लक्ष केंद्रीत करुन शेतकऱ्यांच्या पशुंचे संवर्धन करण्यासाठी जिल्ह्यातील ७२ ठिकाणी उघडण्यात आलेले दवाखाने आजही जनावरांना संपूर्ण सेवा देण्यासाठी अपयशी ठरत आहेत. जिल्हा परिषदेत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. कांतीलाल पटले यांनी जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थिती दुरुस्त करण्याचा विडा उचचला आहे. त्यांनी सर्व डॉक्टरांना मार्गदर्शन करुन त्यांच्याकडून आपापले दवाखाने उत्तम कसे करता येतील, यावर भर दिला.**

### पुन्हा ५३ दवाखाने आयएसओच्या मार्गावर;शासनाचा मात्र आखडता हात

# खरीप हंगामाकरीता ५१ हजार क्विंटल बियाणांची मागणी

**गोंदिया:-** यंदाच्या खरीप हंमागात कृषी विभागाने ५१ हजार ८१६ क्विंटल बी-बियाणांची मागणी केली आहे. यंदा हवामान खात्याने समाधानकारक पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे बी-बियाणांची मागणी वाढेल, असा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे. कृषी खात्याने येणारा खरीप हंगाम साधण्यासाठी कंबर कसली आहे. तर बळीराजाही सज्ज झाला असून शेतमशागतीच्या कामात व्यस्त दिसत आहेत. जिल्ह्यात यंदाच्या हंगामासाठी २ लाख २० हजार १०८ हेक्टर क्षेत्र पीक लागवडीसाठी प्रस्तावित आहे. यात सर्वाधिक २ लाख १३ हजार ७१७ हेक्टर क्षेत्रात धानाची लागवड करण्यात येईल.६,०३१ हेक्टर क्षेत्रात तूर, २८ हेक्टर क्षेत्रात मुंग, ५८ हेक्टर क्षेत्रात उडीद आणि २७५ हेक्टर क्षेत्रात ढेंचा लागवड करण्यात येणार आहे. त्यामुळे बी-बियाणेही मोठ्या प्रमाणात लागणार आहेत. महाबीजकडून ३१ हजार ७६ क्विंटल तर खाजगी बियाणे कंपनीकडून २० हजार ७७० क्विंटल बियाण्यांची मागणी करण्यात आली आहे.

# न.प.कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत उपस्थित राहण्याची ॲलर्जी

## केव्हाही या अन् केव्हाही जा, वरिष्ठांचे होतेय दुर्लक्ष

**तिरोडा:** शासकी, निमशासकीय कार्यालयांच्या वेळा ठरविल्या असल्या तरी अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत गायब राहत असल्याचे चित्र येथील नगरपरिषदेत नेहमीच पाहायला मिळत आहे. असाच काहीसा प्रकार येथील नगरपरिषद कार्यालयात उघडकीस आला. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर वचक कुणाचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अनेक तक्रारी, निवेदने, अर्ज व विविध कामांसाठी शहरातील नागरिक नगरपरिषद कार्यालयात जातात. गुरुवार (दि.३०) कार्यालयाला भेट दिली असता, नगरपरिषदेत आवक-जावक टेबलाचे काम सांभाळणारे कर्मचारी कार्यालयात दुपारी २ नंतर सायंकाळपर्यंत आढळले नाही. नगरपरिषदेचे मुख्य दार उघडे असले तरी कार्यालयात काही कर्मचारी आढळून आले नाही. मुख्याधिकाऱ्यांनी २१ मे रोजी एक कार्यालयीन आदेश काढला आहे. त्या आदेशामध्ये कार्यालयीन कामकाजात गतिमानता आणण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना दुपारी जेवणाची वेळ १:३० ते २ वाजेपर्यंत राहणार असल्याचे नमूद केले आहे. मात्र, त्यानंतरही कर्मचारी गायब राहत असल्याने प्रशासकीय व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



**आलेल्या सर्व तक्रारींवर व आवक-जावकमध्ये असलेल्या कर्मचाऱ्याला शोकाय नोटीस देण्यात आला आहे. दप्तर दिरंगाई कायद्यांतर्गत नियमाणप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल.**

**राहूल परिहार, मुख्याधिकारी, नगरपरिषद, तिरोडा**

# भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघ विधानसभानिहाय आकडेवारी

| Name of Assembly Segment | No. of valid votes cast in favour of | | | | | | | | | | | | | | | | | | Total of valid votes | No. of rejected votes | NOTA | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Kumbhalkar Sanjay Bhaiyy | Dr.Prashant Yadaorao Padole | Sunil Baburao Mendhe | Ajaykumar Bhartiya | Devilal Sukhram Nepale | Vilas Baburao Lende | Sanjay Gajanan Kewat | Dr. Akash Madhukar Jibhakate | Itwale Sharad Martand | Chaitram Dasharath Kokase | Tulsiram Urkuda Gedam | Pradeep Dhobale | Beniram Ramchand Fulbandhe | Virendrakumar Kasturchand Jaiswal | Vilas Jiyalal Raut | Sumit Vijay Pande | Suryakiran Ishwar Nandagawali | Sewakbhau Nirdhan Waghaye | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 60 - Tumsar | 3,979 | 1,00,220 | 91,204 | 642 | 314 | 240 | 2,932 | 246 | 114 | 165 | 115 | 167 | 166 | 360 | 227 | 567 | 190 | 1,234 | 2,03,082 | 0 | 1,656 | 2,04,738 |
| 61 - Bhandara | 6,766 | 1,22,428 | 99,575 | 723 | 374 | 270 | 7,716 | 310 | 123 | 180 | 192 | 336 | 213 | 411 | 328 | 711 | 213 | 1,723 | 2,42,592 | 0 | 1,810 | 2,44,402 |
| 62 - Sakoli | 4,638 | 1,17,501 | 90,135 | 709 | 401 | 347 | 5,250 | 836 | 438 | 100 | 163 | 177 | 233 | 329 | 283 | 663 | 196 | 6,367 | 2,28,766 | 0 | 1,474 | 2,30,240 |
| 63 - Arjuni Morgaon | 2,719 | 92,455 | 71,797 | 611 | 262 | 437 | 6,639 | 262 | 87 | 76 | 121 | 115 | 194 | 326 | 273 | 637 | 163 | 1,642 | 1,78,816 | 0 | 1,148 | 1,79,964 |
| 64 - Tiroda | 2,323 | 73,762 | 82,700 | 587 | 264 | 122 | 847 | 199 | 88 | 91 | 109 | 150 | 208 | 363 | 249 | 467 | 135 | 1,211 | 1,63,875 | 0 | 2,055 | 1,65,930 |
| 65 - Gondiya | 4,679 | 75,312 | 1,10,811 | 726 | 385 | 208 | 1,144 | 119 | 170 | 168 | 131 | 218 | 468 | 593 | 251 | 674 | 235 | 722 | 1,97,014 | 0 | 1,963 | 1,98,977 |
| Total | 25,104 | 5,81,678 | 5,46,222 | 3,998 | 2,000 | 1,624 | 24,528 | 1,972 | 1,020 | 780 | 831 | 1,163 | 1,482 | 2,382 | 1,611 | 3,719 | 1,132 | 12,899 | 12,14,145 | 0 | 10,106 | 12,24,251 |
| No. of votes recorded on postal ballot papers | 358 | 5,735 | 3,811 | 59 | 9 | 25 | 330 | 9 | 8 | 11 | 11 | 33 | 15 | 7 | 5 | 0 | 30 | 204 | 10,660 | 2,061 | 162 | 12,883 |
| Grand Total | 25,462 | 5,87,413 | 5,50,033 | 4,057 | 2,009 | 1,649 | 24,858 | 1,981 | 1,028 | 791 | 842 | 1,196 | 1,497 | 2,389 | 1,616 | 3,719 | 1,162 | 13,103 | 12,24,805 | 2,061 | 10,268 | 12,37,134 |

# वादळाचा पर्यटन संकुलाला फटका



गोंदिया: २८ मे च्या सायंकाळी आलेल्या जोरदार वादळी वाऱ्याचा फटका नवेगावबांध पर्यटन संकुलाला बसला आहे. २९ तारखेला नवेगावबांध येथे पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना नवेगावबांधातील पर्यटनाचा आनंद घेता आलेला नाही त्यामुळे पर्यटकांची निराशा झाली. तर या वादळी वाऱ्यामुळे नवेगावबांध पर्यटन संकुल परिसरातील असंख्य झाडे,मोठी झाडे, विद्युत खांब,तारा व वनविभाग व वन्यजीव विभागाच्या इमारतींना याचा जोरदार फटका बसला आहे. ठिकठिकाणी तुटून पडलेली झाडे हे त्या इमारतींवर किंवा त्या तारांवर पडल्याने छप्परची मोडतोड झाली.परिसरातील संपूर्ण जाळी तुटून पडली आहे.

या ठिकाणी प्रसिद्ध असलेले नवेगावबांध-नागझीराचे श्रेत्रसंचालकांचे लॉगहट विश्राम गृह, साहसी खेळ, हिलटॉप गार्डन,ग्रीनपार्क उपहार गृह, गार्डन व इतर मालमत्तेवर वादळी तडाख्याचा परिणाम झालेला असून, मोठे नुकसान झालेले आहे.तर सदर पर्यटक संकुलातील परिसराची विद्युत पुरवठा ३१ मे च्या सायंकाळपर्यंत सुरू होण्याची चिन्हे नाही.गेल्या चार दिवसापासून संपूर्ण संकुल परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या मशीनी विद्युत पुरवठा अभावी बंद आहेत.

सदर ठिकाणी वन विभागाकडून कुंडल येथून आलेले वन प्रशिक्षणार्थी तसेच चंद्रपूर वन प्रबोधिनी कडून आलेले वन प्रशिक्षणार्थी यांची या ठिकाणी प्रशिक्षण सुरू होते. त्यांच्या करिता आपत्कालीन व्यवस्था म्हणून दोन जनरेटरची व्यवस्था वन्यजीव विभाग कडून करण्यात आली होती.या मोठ्या जनरेटरमुळे त्यांचे प्रशिक्षण पार पडले.

इतर व्यवस्था अजूनही जसेच्या तसेच आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटन क्षेत्राला इजा पोहोचली आहे. ही हानी भरून निघण्यासाठी बराच वेळ जाणार असून,या विभागामध्ये पर्यटन संकुल ज्यांच्या अत्क्यारित आहे, असे महसूल विभाग, पाटबंधारे विभाग, वन विभाग(प्रादेशिक) व वन्यजीव विभाग (नवेगावबांध-नागझीरा). मोठ्या प्रमाणात या संकुल परिसरातील दरमहा लाखो-लाख रुपयाचे महसूल गोळा करणारी नवेगावबांध येथील संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून अजूनही दखल घेतली नसल्याचे दिसून येत आहे. संपूर्ण परिसर हा जसेच्या तसे पडलेला आहे.

हे परिसर ज्यांच्या ताब्यात आहे,त्यांच्याकडून कुठल्याही हालचाली या ठिकाणी दिसत नाही.त्यामुळे हे पर्यटन क्षेत्र सध्यातरी या कामाविना पोरका झाल्याचे दिसत आहे.तर या ठिकाणी पडलेल्या झाडांचे सर्व लाकूड इंधन म्हणून गावातील लोकांनी मोठ्या प्रमाणात गेल्या तीन दिवसापासून डुलाई करत आहे. त्या मुळेच निदान येजा होत आहे. वन व वन्यजीव विभागाच्या ताब्यातील शासकीय ईमारतीचे पंचनामे करून अहवाल वरिष्ठा कडे पाठविल्यानंतर सदर इमारती दुरूस्त करण्यात येतील असे समजते.

## पर्यटकांची मात्र होते आहे निराशा

### येत्या १५ दिवसात पावसाळा सुरू होणार आहे, तेव्हा सर्व विभागाची कसोटी लागणार आहे

**सध्या संयुक्त वन व्यवस्थापन समिती च्या व्यवस्थापना कडे असलेले हिलटॉप गार्डन गेल्या ४ दिवसापासून पाण्याअभावी प्रभावित झाले आहे. याकडे वनविभाग व संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून काहीच उपाययोजनां होताना सध्या तरी दिसत नाही. मात्र यात पर्यटकांची खूप निराशा होत आहे. पर्यटन संकुलाची व्यवस्था पूर्ववत लवकरात लवकर करावी अशी मागणी पर्यटक प्रेमी करीत आहेत.**

# एकाच रक्तपेढीवर शासकीय रुग्णालय अवलंबून




गोंदिया : जिल्ह्यात केवळ बाई गंगाबाई रुग्णालयात शासकीय व एक खासगी रक्तपेढी आहे. जिल्ह्यातील इतर कोणत्याही रुग्णालयात रक्तपेढी नसल्याने रक्तपुरवठ्याची भिस्त एकाच रक्तपेढीवर आहे. परिणामी दूरवरच्या रुग्णांना, अपघातग्रस्तांना वेळेवर रक्त पुरवठा करणे अनेकदा कठीण होते.

जिल्ह्यात एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, एक जिल्हा सामान्य रुग्णालय, एक बाई गंगाबाई महिला रुग्णालय, तिरोडा येथे उपजिल्हा रुग्णालय, १४ ग्रामीण रुग्णालय व जवळपास ४० प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. यापैकी केवळ तिरोडा व देवरी ग्रामीण रुग्णालयात रक्ताचे स्टोरेज सेंटरची सुविधा आहे. सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव ग्रामीण रुग्णालयांमध्ये स्टोरेज सेंटरच्या कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे. त्यांना फूड अँड ड्रग विभागाची मान्यता मिळाली आहे. मात्र अद्यापही येथे स्टोरेज सेंटर सुरु करण्यात आले नाही. त्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याची माहिती आहे. देवरी ग्रामीण रुग्णालयात व तिरोडा उपजिल्हा रुग्णालयात रक्त साठविण्यासाठी सर्व तांत्रिक बाबी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

या रुग्णालयांमध्ये प्रसुतीचे प्रमाण अधिक आहे. प्रसुतीच्या दरम्यान रक्ताची गरज पडल्यास त्यांच्या स्टोरेज सेंटरमधील रक्त वापरता येते. या स्टोरेज सेंटरला रक्ताच्या क्रॉस मॅचिंगसाठी व इतर तपासण्यांसाठी टेक्निशियन कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांनी महिन्यानुसार मागणी केल्याप्रमाणे शासकीय रक्तपेढीतून रक्ताचा पुरवठा केला जातो. परंतु इतर ग्रामीण रुग्णालयात स्टोरेज सेंटर नाही. परिणामी तेथील रुग्णांना बाई गंगाबाई रुग्णालय किंवा खासगी रक्तपेढी गाठावे लागते. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयात स्टोरेज सेंटर तयार करण्याची गरज आहे.

रक्ताची सर्व तपासणी व क्रॉस मॅचिंगची सुविधा गंगाबाई रुग्णालयातील शासकीय रक्तपेढीत आहे. इतर ठिकाणी ही सुविधा नाही. जर शासकीय रक्तपेढीत संबंधित रुग्णालयातून फ्फोन करुन रक्ताची मागणी केल्यास रक्ताचा पुरवठा करण्याची व्यवस्था केली जाते. शिवाय सिकलसेल ग्रस्तांनाही गंगाबाई रुग्णालयाच्या रक्तपेढीत येऊन व रुग्णालयात दाखल करुन रक्त दिले जाते. त्यामुळे आजघडीला तरी एकाच रक्तपेढीवर जिल्ह्याचे भिस्त आहे.

# २१० विद्यार्थ्यांना मिळाला स्वाधारचा आधार

## सरकारी तिजोरीतून ९० लाखांचे अनुदान:३ वर्षात मिळाला लाभ




गोंदिया: शिक्षणापासून दूर गेलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र सरकारने स्वाधार योजना सुरु केली आहे. योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जाती, नवबौद्ध वर्गातील विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी, १२ वी सोबतच बारावीनंतरच्या व्यावसायीक तसेच बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात, शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकरिता ही योजना आहे. प्रत्येक शैक्षणिक वर्षात ४३ हजार रुपये आर्थिक सहाय्य केले जात आहे. सरकारची ही योजना विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांचे भविष्य अधिक सुरक्षित करणे, या हेतूने सुरु करण्यात आली आहे. गत तीन वर्षात गोंदिया जिल्ह्यातील २१० विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे.

स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांच्या कुटुंबियांचे वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा अधिक असू नये. विद्यार्थी इयत्ता १० वी, १२ वीनंतर पुढील जे कोणतेही शिक्षण घेईल, त्याचा कालावधी दोन वर्षापेक्षा अधिक असू नये. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याला १०, १२ वीमध्ये किमान ५० टक्के गुण असावे. याशिवाय विद्यार्थी जर शारीरिक विकलांग, दिव्यांग असेल तर ही अट शिथिल करुन ४० टक्के आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यानना योजनेमध्ये ३ टक्के आरक्षणही आहे. महत्वाचे म्हणजे लाभार्थी विद्यार्थी हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. मात्र स्थानिक नसावा. त्याच्याकडे सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र, स्वत:चे आधार कार्ड, बँकेचे खाते असावे. स्वाधार योजनेचा लाभ प्रामुख्याने अनुसूचित जाती, नवबौद्ध समुदाय वर्गातील विद्यार्थ्यांना दिला जातो. ज्यामुळे विद्यार्थी, विद्यार्थिनींना दहावी-बारावी तसेच यानंतरचे व्यावसायीक, बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षात भोजन भत्यासाठी २५ हजार रुपये, निवास भत्यासाठी १२ हजार आणि निर्वाह भत्यासाठी ६ हजार असे एकूण ४३ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. गोंदिया जिल्ह्यात २०१९-२० या वर्षात १०८, २०२०-२१ या वर्षात ९३ आणि २०२१-२२ या वर्षात ९ अशा २१० विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा आधार मिळाला आहे. आतापर्यंत लाभार्थी विद्यार्थ्यांना सरकारी तिजोरीतून ९० लाख ३० हजार रुपये अनुदान स्वरुपात देण्यात आले आहे.

**ज्या विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहून उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असते. मात्र, त्यांना प्रवेश मिळत नाही, अशा ५० टक्के पेक्षा अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जातो. आतापर्यंत योजनेंतर्गत जिल्ह्यातील २१० विद्यार्थ्यांना लाभ मिळाला असून ९० लाखांपेक्षा अधिकची अनुदान राशी विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. गरजूंनी योजनेचा लाभ घ्यावा.**

**विनोद मोहतुरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गोंदिया**

# ओबीसी चळवळीचे सक्रिय पदाधिकारी पेमेंद्र चव्हाण यांचे दु:खद निधन



गोंदिया-गोंदिया जिल्ह्यातील फ्फुले शाहू आंबेडकरी विचाराचे ओबीसी बहुजन चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणारे ओबीसी चळवळीचे जिल्ह्यातील सक्रिय पदाधिकारी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंगेराचे मुख्याध्यापक पेमेंद्र चव्हाण(मूळ गाव डव्वा,ता.सडक अर्जुनी)यांचे ३ जून रोजी दिर्घ आजाराने नागपूरातील रुग्णालयात दुःखद निधन झाले.मृत्यूपंरात त्यांनी आपले डोळे दान करुन नवी दिशा दिली आहे.त्यांच्या मृत्यूने गोंदिया जिल्ह्यातील ओबीसी चळवळीला मोठा धक्का बसला आहे.पेमेंद्र चव्हाण यांच्या मागे आई,दोन भाऊ पत्नी,२ मुले,१ मुलगी अशा बराच मोठा परिवार आहे.त्यांच्यावर ४ जून रोजी गोंदिया येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी नातेवाईकासंह फुले आंबेडकरी ओबीसी चळवळीतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरिपासाठी पीक कर्ज किती मिळणार? पीकनिहाय ठरले दर

## शेतकऱ्यांकडून कर्जासाठी अर्ज: खरीप हंगामासाठी तांत्रिक समितीने ठरवले दर

गोंदिया: शेतकऱ्यांना एकरी किती पीक कर्ज द्यायचे, याबाबत जिल्हास्तरीय तांत्रिक समिती निर्णय घेते. यावर्षी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति एकरी २७ हजार रुपये प्रमाणे पीक कर्ज दिले जाणार आहे.

शासनामार्फत शेतकऱ्यांना बिनव्याजी पीक कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. लागवडीसाठी येणारा खर्च लक्षात घेून किती पीक कर्ज द्यायचे, याााबतचा निर्णय जिल्हास्तरीय तांत्रिक सल्लागार समिती घेते. या समितीने ठरवून दिलेल्या पीक कर्जाच्या रकमेच्या अधिक कर्ज बँका देऊ शकतात. मात्र त्यापेक्षा कमी कर्ज देऊ शकत नाहीत.

किमान रकमेच्या पुढे किती कर्ज द्यायचे, हा निर्णय संबंधित बँकेचा असतो. त्यामुळे पीक कर्जाच्या रकमेत बँकनिहाय बदल आढळतो.

### धान पिकाला एकरी २७ हजार रुपये

**जिल्ह्यात धान पिकाची सर्वाधिक लागवड केली जाते. या पिकाची रोवणी, निंदण, कापणी, बांधणी, मळणी करावी लागते. सोबतच किटकनाशके व रासायनिक खतांचा वापर करावा लाागते. त्यामुळे खर्च अधिक येथे. यावर्षीच्या खरीप हंगामात धान उत्पादकांना एकरी २७ हजार रुपये किमान कर्ज दिले जाणार आहे.**

### पीक कर्जाचे वितरण सुरु

**ज्या शेतकऱ्यांनी मार्चपुर्वी पीक कर्ज भरले आहे. अशा शेतकऱ्यांना मे महिन्यात पीक कर्जाचे वितरण करण्यात येत आहे. खरीप हंगाम जवळ आला असल्याने शेतकरी पीक कर्जाचे अर्ज बँकेकडे सादर करत आहेत. जिल्हा बँकेने आतापर्यंत ३६ हजार शेतकऱ्यांना १६० कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप केले आहे.**

### म्हैस व गायीसाठी २३ हजार तर शेळीसाठी २० हजारांचे कर्ज



**शेतीबरोबरच काही शेतकरी पशुपालनाचा व्यवसाय करतात. या व्यवसायासाठी काही शेतकरी कर्जाची मागणी करतात. बँकांनी या शेतकऱ्यांना पशु खरेदीसाठी किती कर्ज द्यावे, हे ठरविले जाते. म्हैस व गाय प्रत्येकी एक नगासाठी २३ हजार रुपये, शेळी व मेंढी खरेदीसाठी (सहाचा गट) २० हजार ७०० रुपये, तलावातील मत्स्य संवर्धनासाठी ३ लाख रुपये तर जलाशयातील मत्स्य संवर्धनासाठी ३४ हजार रुपये मिळतात.**



**दरवर्षी येणारा खर्च लक्षात घेऊन तांत्रिक समिती किती पीक कर्ज द्यायचे, याचा निर्णय घेते. तसे पत्र प्रत्येक बँकेला पाठवले जाते. त्याची अंमलबजावणी बँकेने करणे आवश्यक आहे. समितीने ठरवून दिलेल्या कर्ज मर्यादेच्या अधिक कर्ज बँका देऊ शकतात. मात्र, त्यापेक्षा कमी कर्ज देऊ शकत नाहीत.**

**सुरेश टेटे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जीडीसी बँक, गोंदिया**

# वनहक्क जमिनीचे प्रस्ताव त्वरीत मार्गी लावा-माजी मंत्री राजकुमार बडोले



अर्जुनी मोरगाव :- अर्जुनी मोर. विधानसभा क्षेत्रातील अनेक लाभारथ्यांचे वनहक्क जमिनीचे प्रस्ताव धुळखात पडले असुन सदर वनहक्क जमिनीचे प्रस्ताव त्वरीत मार्गी लावा अशा आशयाचे निवेदन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी अर्जुनी मोर. चे उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांना दिले आहे.

अर्जुनी मोर. विधानसभा क्षेत्र हा आदिवासी बहुल आहे. मागील दहा ते पंधरा वर्षापासुन वन जमीनीवरील अतिक्रमण धारक शेतकरी बांधवांचे वनहक्क समीती मार्फत सादर केलेले प्रस्ताव प्रलंबित असुन त्यावर कार्यवाही होवुन निकाली काढण्यात यावे. तसेच अनेक प्रकरणे गहाळ सुध्दा झालेली आहेत.त्या गहाळ प्रकरणांचा त्वरीत शोध घेवुन ते सुध्दा निकाली काढण्यात यावे. अशा विवीध मागण्यांचे निवेदन माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांना देवुन याबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी सडक/अर्जुनी तालुका भाजपा अध्यक्ष लक्ष्मीकांत धानगाये, पंचायत समिती उपसभापती शालींदर कापगते, पंचायत समिती सदस्य चेतन वळगाये, तथा वनहक्क पट्टे न मिळालेले शेतकरी गोवर्धन परशुरामकर, सुभाष सोनवाने, भोजराम सोनवाने, दौलत राऊत, राजाराम सोनवाने, गोपीचंद नेवारे, भुमेश्वर मोहणकर, यादवराव लांजेवार, रामजी कापगते, मोहण गावराने, व्यंकट येवले, नुतनलाल अंबुले, मयाराम ठाकरे, दोडकु मोहणकर, ईश्वर कोरे, पिरमबापु राऊत, मनराज गहाणे, व अन्य कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# कामगारांच्या थाळीतून गोंदिया जिल्हा बाद

## मोफत जेवणापासून वंचित, जिल्ह्यात ९८ हजार कामगारांची नोंद बहुतांश कामगारांचे नुतनीकरणच नाही



गोंदिया: जे कामगार नोंदणीकृत आहेत. तसेच इमारत, वीटभट्टी आदी ठिकाणी काम करतात. अशा कामगारांकरिता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मोफत जेवणाची योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्ह्यात ९८ हजार ६२२ कामगारांची नोंद आहे. मात्र, मोठे उद्योग नसल्याचे कारण पुढे करुन जिल्ह्यात अद्यापही मोफत जेवणाची सोय सुरु करण्यात आली नाही. परिणामी जिल्ह्यातील कामगारांना मोफत जेवणापासून वंचित राहावे लागत आहे.

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे कामगारांनी नोंद करायची आहे. कामगार नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड अशी विविध कागदपत्रे तसेच कामगार ज्या आस्थापनांमध्ये काम करतात अशा आस्थापनांचे प्रमाणपत्र घेऊन कामगार आयुक्त कार्यालयात नोंदणी करावी लागते. त्या कामगारांकरिता शासनाने विविध योजना सुरु केल्या आहे. जिल्ह्यात ९८ हजार ६२२ कामगारांची नोंद आहे. मात्र, बहुतांश कामगारांनी नोंदणी आणि नुतनीकरण केले नाही. त्यामुळे सध्या सक्रिय कामगार ९ हजार ७१४ आहेत. कामगारांना दुपारचे जेवण कामाच्या ठिकाणी मोफत उपलब्ध करुन देण्याची योजना आहे. कोरोनापुर्वी त्याकरिता पाच रुपये आकारण्यात येत होते. मात्र शासनाने ते पाच रुपये देखील माफ केले. त्यामुळे आता कामगाराला रुपया देखील द्यावा लागत नाही. शासनाची योजना असताना देखील जिल्ह्यात लाखो कामगार असताना देखील एकाही कामगाराला आतापर्यंत दुपारचे मोफत जेवन दिले जात नाही. मोठ्या आस्थापना नसल्यामुळे कामगारांना जेवण पुरविणे अडचणीचे असल्याचे कामगार आयुक्त कार्यालयाचे म्हणणे आहे.

एकीकडे मोफत जेवण दिले जात नसताना जिल्ह्यातील १० हजार कामगारांना चालू वर्षात सेफ्टी किटचे वाटप शासनामार्फत करण्यात आले आहे.

### योजना फक्त जाहिरातीपुरती

**कामगार विभागातर्फे शहरात ठिकठिकाणी कामगारांना मोफत जेवण देण्यात येत असल्याचे जाहिरात फलक यापुर्वी लावून जनजागृती करण्यात आली. काही कामगारांनी त्याकरिता आटापिटा देखील केला. मात्र, जिल्ह्यात ती योजना राबविण्यात येत नसल्याचे कळल्यानंतर त्यांच्या अपेक्षेवर पाणी फेरले गेले. जिल्ह्यात मोठे उद्योग नसल्यामुळे असंघटीत कामगारांना जेवण देणे शक्य नसल्याचे कामगार आयुक्त कार्यालयाचे म्हणणे आहे.**

### मृत्यू झाल्यास पाच लाख

**गोंदियात मोठे कन्स्ट्रक्शन साइट नाहीत. त्यामुळे कामगारांना जेवण पुरविणे शक्य होत नाही. कामगाराचा कामाच्या ठिकाणी मृत्यू झाल्यास आणि त्या कामागाराची नोंदणी असेल तर शासनाच्यावतीने त्या व्यक्तीच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची मदत शासनाच्यावतीने करण्यात येते. कामगारांनी आपली नोंदणी करणे गरजेचे आहे.**

**उज्जवल लोया, कामगार आयुक्त**



# विदर्भात काँग्रेसची आघाडी, तर राज्यात महाविकास आघाडीचे वर्चस्व



**मुंबई :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी पूर्ण झाली आहे. या निवडणुकीत काँग्रेस १३, भाजप ९, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ९, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) ८, शिवसेना ७ तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि अपक्ष यांचा प्रत्येकी एक उमेदवार विजयी झाले आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

राज्यात पाच टप्प्यात मतदान पार पडले होते. या मतदानाची मोजणी ४ जून रोजी शांततेत पार पडली. या मतमोजणीमध्ये मतदारसंघनिहाय विजयी उमेदवार व दुस?्या क्रमांकावरील मते मिळालेल्या उमेदवारांची माहिती पुढीलप्रमाणे :

| मतदारसंघ | उमेदवाराचे नाव | पक्ष | मिळालेले मत |
|---|---|---|---|
| १.नंदुरबार | ॲड.गोवाल कागडा पाडवी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ७,४५,९९८ |
| | डॉ. हिना विजयकुमार गावित | भारतीय जनता पक्ष | ५,८६,८७८ |
| २.धुळे | शोभा दिनेश बच्छाव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५,८३,८६६ |
| | सुभाष रामराव भामरे | भारतीय जनता पक्ष | ५,८०,०३५ |
| ३.जळगाव | स्मिता उदय वाघ | भारतीय जनता पक्ष | ६,७४,४२८ |
| | करण बाळासाहेब पाटील | शिवसेना (उबाठा) | ४,२२,८३४ |
| ४.रावेर | रक्षा निखिल खडसे | भारतीय जनता पक्ष | ६,३०,८७९ |
| | श्रीराम दयाराम पाटील | राकाँ (शरदचंद्र पवार) | ३,५८,६९६ |
| ५.बुलढाणा | प्रतापराव गणपतराव जाधव | शिवसेना | ३,४९,८६७ |
| | नरेंद्र दगडू खेडेकर | शिवसेना (उबाठा) | ३,२०,३८८ |
| ६.अकोला | अनुप संजय धोत्रे | भारतीय जनता पक्ष | ४,५७,०३० |
| | अभय काशीनाथ पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४,१६,४०४ |
| ७.अमरावती | बळवंत बसवंत वानखडे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५,२६,२७१ |
| | नवनीत रवी राणा | भारतीय जनता पक्ष | ५,०६,५४० |
| ८.वर्धा | अमर शरदराव काळे | राकाँ (शरदचंद्र पवार) | ५,२६,२८९ |
| | रामदास चंद्रभान तडस | भारतीय जनता पक्ष | ४,४४,९३२ |
| ९.रामटेक | श्यामकुमार (बबलू) दौलत बर्वे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ६,१३,०२५ |
| | राजू देवनाथ पारवे | शिवसेना | ५,३६,२५७ |
| १०.नागपूर | नितिन जयराम गडकरी | भारतीय जनता पक्ष | ६,५५,०२७ |
| | विकास ठाकरे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५,१७,४२४ |
| ११.भंडारा-गोंदिया | डॉ. प्रशांत यादवराव पडोले | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५,८७,४१३ |
| | सुनील बाबूराव मेंढे | भारतीय जनता पक्ष | ५,५०,०३३ |
| १२.गडचिरोली-चिमूर | डॉ. नामदेव किरसान | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ६,१७,७९२ |
| | अशोक महादेवराव नेते | भारतीय जनता पक्ष | ४,७६,०९६ |
| १३.चंद्रपूर | प्रतिभा सुरेश उर्फ बाळूभाऊ धानोरकर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ७,१८,४१० |
| | सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार | भारतीय जनता पक्ष | ४,५८,००४ |
| १४.यवतमाळ-वाशिम | संजय उत्तमराव देशमुख | शिवसेना (उबाठा) | ५,९४,८०७ |
| | राजश्री हेमंत पाटील | शिवसेना | ५००३३४ |
| १५.हिंगोली | नागेश बापूराव आष्टीकर पाटील | शिवसेना (उबाठा) | ४,९२,५३५ |
| | बाबूराव कदम कोहळीकर | शिवसेना | ३,८३,९३३ |
| १६.नांदेड | वसंतराव बळवंतराव चव्हाण | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ५,२८,८९४ |
| | प्रतापराव गोविंदराव चिखलीकर | भारतीय जनता पक्ष | ४,६९,४५२ |
| १७.परभणी | संजय (बंडू) हरिभाऊ जाधव | शिवसेना (उबाठा) | ६,०१,३४३ |
| | महादेव जगन्नाथ जानकर | राष्ट्रीय समाज पक्ष | ४,६७,२८२ |
| १८.जालना | कल्याण वैजीनाथराव काळे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ६,०७,८९७ |
| | रावसाहेब दादाराव दानवे | भारतीय जनता पक्ष | ४,९७,९३९ |
| १९.औरंगाबाद | संदिपानराव भुमरे | शिवसेना | ४,७६,१३० |
| | इम्तियाज जलील | एमआयएम | ३,४१,४८० |
| २०.दिंडोरी | भास्कर मुरलीधर भगरे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ५,७७,३३९ |
| | डॉ. भारती प्रवीण पवार | भारतीय जनता पक्ष | ४,६४,१४० |
| २१.नाशिक | राजाभाऊ (पराग) प्रकाश वाजे | शिवसेना (उबाठा) | ६,१६,७२९ |
| | हेमंत तुकाराम गोडसे | शिवसेना | ४,५४,७२८ |
| २२.पालघर | डॉ. हेमंत विष्णू सावरा | भारतीय जनता पक्ष | ६,०१,२४४ |
| | भारती भारत कामडी | शिवसेना (उबाठ) | ४,१७,९३८ |
| २३.भिवंडी | बाळ्यामामा ऊर्फ सुरेश गोपीनाथ म्हात्रे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ४,९९,४६४ |
| | कपिल मोरेश्वर पाटील | भारतीय जनता पक्ष | ४,३३,३४३ |
| २४.कल्याण | डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे | शिवसेना | ५,८९,६३६ |
| | वैशाली दरेकर | शिवसेना (उबाठा) | ३,८०,४९२ |
| २५.ठाणे | नरेश गणपत म्हस्के | शिवसेना | ७,३४,२३१ |
| | राजन बाबूराव विचारे | शिवसेना (उबाठा) | ५,१७,२२० |
| २६.मुंबई उत्तर | पियुष गोयल | भारतीय जनता पक्ष | ६,८०,१४६ |
| | भूषण पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ३,२२,५३८ |
| २७.मुंबई उत्तर पश्चिम | रवींद्र दत्ताराम वायकर | शिवसेना | ४,५२,६४४ |
| | अमोल गजानन किर्तीकर | शिवसेना (उबाठा) | ४,५२,५९६ |
| २८.मुंबई उत्तर पूर्व | संजय दिना पाटील | शिवसेना (उबाठा) | ४,५०,९३७ |
| | मिहिर कोटेचा | भारतीय जनता पक्ष | ४,२१,०७६ |
| २९.मुंबई उत्तर मध्य | वर्षा एकनाथ गायकवाड | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४,४५,५४५ |
| | ॲड. उज्वल निकम | भारतीय जनता पक्ष | ४,२९,०३१ |
| ३०.मुंबई दक्षिण मध्य | अनिल यशवंत देसाई | शिवसेना (उबाठा) | ३,९५,१३८ |
| | राहुल रमेश शेवाळे | शिवसेना | ३,४१,७५४ |
| ३१.मुंबई दक्षिण | अरविंद गणपत सावंत | शिवसेना (उबाठा) | ३,९५,६५५ |
| | यामिनी यशवंत जाधव | शिवसेना | ३,४२,९८२ |
| ३२.रायगड | सुनिल दत्तात्रय तटकरे | राष्ट्रवादी काँग्रेस | ५,०८,३५२ |
| | अनंत गिते | शिवसेना (उबाठा) | ४,२५,५६८ |
| ३३.मावळ | श्रीरंग अप्पा चंदू बारणे | शिवसेना | ६,९२,८३२ |
| | संजोग वाघेरे पाटील | शिवसेना (उबाठा) | ५,९६,२१७ |
| ३४.पुणे | मुरलीधर मोहोळ | भारतीय जनता पक्ष | ५,८४,७२८ |
| | रवींद्र हेमराज धंगेकर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ४,६१,६९० |
| ३५.बारामती | सुप्रिया सुळे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ७,३२,३१२ |
| | सुनेत्रा अजितदादा पवार | राष्ट्रवादी काँग्रेस | ५,७३,९७९ |
| ३६.शिरूर | डॉ. अमोल कोल्हे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ६,९८,६९२ |
| | शिवाजी दत्तात्रय आढळराव | राष्ट्रवादी काँग्रेस | ५,५७,७४१ |
| ३७.अहमदनगर | निलेश ज्ञानदेव लंके | राकाँ(शरदचंद्र पवार) | ६,२४,७९७ |
| | डॉ.सुजय राधाकृष्ण विखे-पाटील | भारतीय जनता पक्ष | ५,९५,८६८ |
| ३८.शिर्डी | भाऊसाहेब राजाराम वाकचौरे | शिवसेना (उबाठा) | ४,७६,९०० |
| | सदाशिव किसन लोखंडे | शिवसेना | ४,२६,३७१ |
| ३९.बीड | बजरंग सोनवणे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ६,८३,९५० |
| | पंकजा मुंडे | भारतीय जनता पक्ष | ६,७७,३९७ |
| ४०.उस्मानाबाद | ओमप्रकाश भुपालसिंह ऊर्फ पवनराजे निंबाळकर | शिवसेना (उबाठा) | ७,४८,७५२ |
| | अर्चना पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस | ४,१८,९०६ |
| ४१.लातूर | डॉ.शिवाजी बंडाप्पा काळगे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ६,०९,०२१ |
| | सुधाकर तुकाराम श्रृंगारे | भारतीय जनता पक्ष | ५,४७,१४० |
| ४२.सोलापूर | प्रणिती सुशीलकुमार शिंदे | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ६,२०,२२५ |
| | राम विठ्ठल सातपुते | भारतीय जनता पक्ष | ५,४६,०२८ |
| ४३.माढा | धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील | राकाँ(शरदचंद्र पवार) | ६,२२,२१३ |
| | रणजितसिंह नाईक निंबाळकर | भारतीय जनता पक्ष | ५,०१,३७६ |
| ४४.सांगली | विशाल प्रकाशबापू पाटील | अपक्ष | ५,७१,६६६ |
| | संजय (काका) पाटील | भारतीय जनता पक्ष | ४,७१,६१३ |
| ४५.सातारा | श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले | भारतीय जनता पक्ष | ५,७१,१३४ |
| | शशिकांत जयवंतराव शिंदे | राकाँ(शरदचंद्र पवार) | ५,३८,३६३ |
| ४६.रत्नागिरी-सिंधुदुर्ग | नारायण तातू राणे | भारतीय जनता पक्ष | ४,४८,५१४ |
| | विनायक भाऊराव राऊत | शिवसेना (उबाठा) | ४,००,६५६ |
| ४७. कोल्हापूर | छत्रपती शाहू शहाजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | ७,५४,५२२ |
| | संजय सदाशिवराव मंडलिक | शिवसेना | ५,९९,५५८ |
| ४८. हातकणंगले | धैर्यशील संभाजीराव माने | शिवसेना | ५,२०,१९० |
| | सत्यजीत बाबासाहेब पाटील | शिवसेना (उबाठा) | ५०,६७,६४ |

# उमेदवारीसाठी लोकसभेला रस्सीखेच, विधानसभेला काय होणार?

## बंडखोरी रोखण्याचे आव्हान, महायुती, महाविकास आघाडीत इच्छुक वाढले



**गोंदिया:** लोकसभा निवडणुकीत उमेदवारीवरुन महायुतीत भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस (अजीत पवार गट) यांच्यात स्पर्धा पाहायला मिळाली. तर भाजपमध्ये अनेक दावेदार असल्याने उमेदवारीवरुन शेवटच्या क्षणापर्यंत भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील सस्पेन्स कायम पाहायला मिळाला. तर महाविकास आघाडीतही चुरस पाहावयास मिळाली. विधानसभेच्या उमेदवारीवरुन आतापासूनच दावे-प्रतिदावे सुरु झाले असून अनेकांनी आपल्या परीने तयारीसुद्धा सुरु केली आहे. त्यामुळे जागावाटप सुखरुपपणे पार पडले तर ठीक, अन्यथा महायुती आणि महाविकास आघाडीला बंडखोरीचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लोकसभेपेक्षाही विधानसभा निवडणुकीत इच्छुकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे जागावाटपावरुन तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. अन्यथा सर्व पक्ष स्वतंत्रपणे नशीब आजमावू शकतात. तूर्त लोकसभा निवडणुकीत काय कौल येतो, याकडे उमेदवारीसाठी कुरघोड्या, शह-काटशहाचे राजकारणही रंगण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र याचे सर्व समीकरण लोकसभा निवडणुकीच्या निकालात किती आमदार उत्तीर्ण होतात यावर अवलंबून असणार आहे.

### कोणाचा किती जागांवर दावा

**■भाजपचे जिल्ह्यातील गोंदिया, तिरोडा, आमगाव-देवरी आणि अर्जुनी मोरगाव या चारही मतदारसंघावर दावा केला आहे. या चारही मतदारसंघात संबंधित इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.**

**■काँग्रेसनेसुद्धा गोंदिया, तिरोडा, आमगाव-देवरी आणि अर्जुनी मोरगाव या चारही मतदारसंघावर दावा सांगत तयारी केली आहे. तर इच्छुकांची संख्यासुद्धा बरीच दिसूनआहे.**

**■राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटानेसुद्धा अर्जुनी मोरगावसह, गोंदिया मतदारसंघावर दावा केला आहे. पण अंतिम निर्णय हा खा. प्रफुल्ल पटेल यांच्यावर अवलंबून असणार आहे.**

**■राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटानेसुद्धा अर्जुनी मोरगावसह, गोंदिया मतदारसंघावर दावा सांगत तयारीला सुरुवात केली आहे.**

**■शिवसेनेनेसुद्धा गोंदिया आणि आमगाव-देवरी या मतदारसंघावर दावा करीत तयारी सुरु केली आहे.**

**■उद्धवसेनेनेसुद्धा तिरोडा आणि गोंदिया विधानसभा मतदारसंघावर दावा करीत तयारी सुरु केली आहे.**



**भाजप जिल्ह्यातील चारही मतदारसंघ लढवत आलेला आहे. यावेळी देखील हा दावा कायम राहील. महायुतीतील सर्व घटकपक्षांना सोबत घेऊनच विजयाच्या रणनितीची दिशा ठरविली जाईल.**

**येसूलाल उपराडे, जिल्हाध्यक्ष भाजप**

**काँग्रेसचा चारही विधानसभा क्षेत्रातील जागांवर दावा असेल. महाविकास आघाडीचे नेते समन्वयाने निर्णय घेतील. तो मान्य करुनच पक्षाची पुढील वाटचाल राहील, वरिष्ठांचा आदेश अंतिम असेल.**

**दिलीप बन्सोड, जिल्हाध्यक्ष काँग्रेस**

### गोंदिया, अर्जुनी मोरगाव मतदारसंघांबाबत उत्सुकता

**गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ.विनोद अग्रवाल हे पक्ष निवडून आले आहेत. त्यामुळे ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरतात की कुठल्या पक्षाकडून हे महत्वपूर्ण ठरणार आहे. तर या मतदारसंघातून भाजप कुणाला संधी देणार हेसुद्धा महत्वाचे असून या मतदारसंघातून इच्छुकांची संख्या बरीच असल्याने उमेदवारीवरुन चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे.**

### उमेदवारीबाबत विधानसभेच्या वेळी काय स्थिती राहणार

**राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडीच्या नवीन समीकरणामुळे तुर्तास कुणीही यावर उघडपणे बोलण्यास तयार नाहीत. मात्र, सर्वच प्रमुख पक्षांनी चार मतदारसंघावर दावा सांगत त्यादृष्टीने तयारी सुरु केली आहे. ४ जूनच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर विधानसभांचे जागावाटपाचे सुत्र निश्चित होईल. त्यानंतरच चित्र स्पष्ट होईल, पण विधानसभा निवडणुकीत जागावाटपावरुन नाराजीनाट्य रंगण्याची शक्यता आहे.**

### जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघाची सध्या स्थिती

| विधानसभा मतदारसंघ | विद्यमान आमदार | पक्ष |
|---|---|---|
| गोंदिया | विनोद अग्रवाल | अपक्ष |
| तिरोडा | विजय रहांगडाले | भाजप |
| अर्जुनी मोरगाव | मनोहर चंद्रीकापुरे | राकाँ (अजीत गट) |
| आमगाव-देवरी | सहषराम कोरोटे | काँग्रेस |

**भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूक २०२४ उमेदवारांना मिळालेली मते**

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| डॉ.प्रशांत पडोळे | काँग्रेस | ५,८७,४१३ |
| सुनील मेंढे | भाजप | ५,५०,०३३ |
| संजय कुंभलकर | बीएसपी | २५,४६२ |
| संजय केवट | वंचित आघाडी | २४,८५८ |
| सेवक वाघाये | अपक्ष | १३१०३ |
| अजयकुमार भारतीय | अखिल भारतीय पार्टी | ४०५७ |
| सुमीत पांडे | अपक्ष | ३७१९ |
| विरेंद्रकुमार जायस्वाल | अपक्ष | २३८९ |
| देवीलाल नेपाले | पिपल्स पार्टी ऑफ इंडिया | २००९ |
| डॉ.आकाश जीभकाटे | अपक्ष | १९८१ |
| विलास लेंढे | लोक स्वराज्य पार्टी | १६४९ |
| विलास राऊत | अपक्ष | १६१६ |
| बेनीराम फुलबांधे | अपक्ष | १४९७ |
| प्रदीप ढोबळे | अपक्ष | ११९६ |
| सूर्यकिरण नंदागवळी | अपक्ष | ११६२ |
| मार्तंड इतवले | अपक्ष | १०२८ |
| तुलसीराम गेडाम | अपक्ष | ८४२ |
| चैतराम खोकसे | अपक्ष | ७९१ |
| नोटा | | १०२६८ |

**लोकसभा निवडणूक २०१४ उमेदवारांना मिळालेली मते**

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| नानाभाऊ पटोले | भाजप | ६०६१२९ |
| प्रफुलभाई पटेल | राष्ट्रवादी काँग्रेस | ४५६८७५ |
| इंजि.संजय नासरे | बसपा | ५०९५८ |
| प्रशांत मिश्रा | आम आदमी पार्टी | ८६४७ |

**लोकसभा निवडणूक २०१८ उमेदवारांना मिळालेली मते**

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| मधुकरराव कुकडे | राष्ट्रवादी काँग्रेस | ४४२२१३ |
| हेमंत पटले | भाजप | ३९४११६ |
| एल.के.मडावी | बीबीएम | ४०३२६ |

**लोकसभा निवडणूक २०१९ उमेदवारांना मिळालेली मते**

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| सुनिल मेंढे | भाजप | ६५०२४३ |
| नाना पंचबुद्धे | राष्ट्रवादी काँग्रेस | ४५२८४९ |
| विजया नंदुरकर | बीएसपी | ५२६५९ |
| के.एन.नान्हे | वंचित आघाडी | ४५८४२ |

**लोकसभा निवडणूक २०२४ उमेदवारांना मिळालेली मते**

| उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|
| डॉ.प्रशांत पडोळे | काँग्रेस | ५,८७,४१३ |
| सुनील मेंढे | भाजप | ५,५०,०३३ |
| संजय कुंभलकर | बीएसपी | २५,४६२ |
| संजय केवट | वंचित आघाडी | २४,८५८ |

# आमदार अग्रवाल यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांगाना ई रिक्शाचे वितरण




**गोंदिया:** गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व चाबी संघटनेचे संस्थापक विनोद अग्रवाल यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ४ जून रोजी येथील पोवार बोर्डींग येथे आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील व विधानसभा मतदारसंघातील चाहत्यांनी उपस्थित राहून आमदार अग्रवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.सोबतच यावेळी ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने १०३ दिव्यागांना बॅटरी चलीत ई रिक्शाचे वितरण करण्यात आले.सोबतच हात पायाने दिव्यांग असणाऱ्यांना कृत्रिम हाथ व पाय लावून त्यांच्या जिवनात आनंद आणण्याचे कार्य यावेळी आमदार अग्रवाल यांच्यावतीने करण्यात आले.

या कार्यक्रमात हिरवळ बहुउद्देशीय संस्था,,ाप्ती फाऊंडेशन व विनोद अग्रवाल मित्र परिवारच्यावतीने ११०० वृक्षरोपट्यांचे वितरण नागरिकांना करण्यात आले.कार्यक्रमाला रोहीत अग्रवाल,घनश्याम पानतवणे,भाऊराव उके,थत्रपाल तुरकर,कशीश जायस्वाल,बंची पंचबुध्दे,वसंत बहुजन,हर्षपाल रंगारी,विक्की बघेले,सभापती मुनेश रहागंडाले,अनिल हुंदानी,बेबी अग्रवार,हर्षपाल रंगारी,ऋषीकांत साहू,कुशल अग्रवाल,ओमेश चौधरी,मुकेश हलमारे,कमलेश सोनवणे आदी उपस्थित होते.

# गडचिरोली-चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदारसंघात काँग्रेसचे डॉ. नामदेवराव किरसान विजयी



**गडचिरोली :-** गडचिरोली- चिमुर (अ.ज.) लोकसभा मतदारसंघ निवडणूकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे डॉ. नामदेवराव किरसान हे विजयी झाले आहेत. त्यांना एकूण ६ लाख १७ हजार ७९२ मते प्राप्त झाली. किरसान यांनी १ लाख ४१ हजार ६९६ मतांनी विजय मिळवित भाजप उमेदवाराचा पराभव केला. विशेष म्हणजे किरसान यांचा गृहमतदारसंघ असलेल्या आमगाव विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचा आमदार असूनही पाहिजे तशी आघाडी घेता आली नाही. याउलट चिमूर मतदारसंघातून सर्वाधिक आघाडी त्यांना भाजप आमदार असताना मिळाली. या मतदारसंघात ८ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. चौथ्या क्रमांकावर नोटाने उडी घेतल्याने वंचितला पाचव्या स्थानावर जावे लागले.

जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजय दैने यांनी हा निकाल जाहिर केला. डॉ. किरसान यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यावेळी उपस्थित होत्या.

शासकीय कृषी महाविद्यालयात मतमोजणी प्रक्रिया झाली. अन्य उमेदवारांना प्राप्त मते - अशोक नेते, भारतीय जनता पार्टी (४७६०९६)४०.८१टक्के मक, योगेश गोन्नाडे, बहुजन समाज पार्टी (१९०५५)१.६३ टक्के, धीरज शेडमागे, जनसेवा गोंडवाना पार्टी (२१७४), बारीकराव मडावी, बहुजन रिपब्लीकन सोशालिस्ट पार्टी (२५५५), सुहास कुमरे,भीमसेना (२८७२), हितेश पांडूरंग मडावी, वंचित बहुजन आघाडी (१५९२२), करण सयाम, अपक्ष (२७८९), विलास कोडापे, अपक्ष(४४०२), विनोद मडावी, अपक्ष (६१२६), नोटा (१६७१४). एकूण वैध मते ११ लाख ६६ हजार ४९७.

जनतेचा विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

लोकसभा निकालानंतर काँग्रेस महाविकास आघाडीचे विजयी उमेदवार डॉ.नामदेव किरसान यांनी हा विजय अपेक्षित होता, अशी प्रतिक्रिया व्यक्त करीत जनतेला दिलेला विश्वासाला तडा दिला जाऊ देणार नाही अशी ग्वाही दिली. भाजपविरोधात जनतेचा सूर होता. देशात, राज्यातील वातावरणाचा परिणाम गडचिरोली-चिमूरमध्येही पहावयास मिळाला.ही निवडणूक जनतेनेच हाती घेतली होती. त्यानंतर कार्यकर्त्यांनीही बूथ रचनेपासून नियोजन केले.त्यामुळे हा विजय सोपा झाला.गेल्या १० वर्षापासून जनतेच्या प्रश्नावर कामे केली.त्याची पावती जनतेने ही संधी म्हणून दिली आहे.मतदारसंघातील विकास कामाचे प्रश्न संसदेत उपस्थित करुन मार्गी लावणार आहे. जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करुन विकासाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणे हा आपला प्रण आहे. तो पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे त्यांनी सांगितले.

# धानोरकर कुटुंबीयांची परंपरा; केंद्र व राज्याच्या मंत्र्यांना करतात पराभूत

**चंद्रपूर :** विधानसभा व लोकसभा निवडणुकीत केंद्रीय व कॅबिनेट मंत्र्याला पराभूत करण्याची धानोरकर कुटूंबाची परंपरा राहिली आहे. सोळाव्या फ़ेरीत राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यापेक्षा २ लाख ६० हजार ४०६ चे मताधिक्य घेवून विजयाच्या मार्गाने निघालेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवार आमदार प्रतिभा धानोरकर यांनी ही परंपरा कायम राखली आहे. मंत्र्यांचा पराभव करण्याची धानोरकर कुटूंबाची परंपरा व इतिहास पुन्हा कायम राखला गेला आहे अशी प्रतिक्रिया आमदार धानोरकर यांनी व्यक्त केली.

आमदार प्रतिभा धानोरकर यांनी पहिल्याच फेरीत मुनगंटीवार यांच्यावर दहा हजार मतांची आघाडी घेतली. त्यानंतर ही आघाडी प्रत्येक फेरीत वाढत गेली. एक लाखांपेक्षा अधिक मतांची आघाडी घेतल्यानंतर माध्यमांशी बोलतांना काँग्रेस उमेदवार धानोरकर यांनी दिड लाखांपेक्षा अधिक मतांनी विजयी होणार असा विश्वास व्यक्त केला होता. सुधीर मुनगंटीवार हे राज्यातील मोठे नेते असून त्यांना राजकारणाचा ३० ते ४० वर्षाचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे त्यांना पराभूत करणे साधे नव्हते. प्रतिभा धानोरकर यांना ७ लाख १८ हजार ४१० तर सुधीर मुनगंटीवार यांना ४ लाख ५८ हजार ००४ मते मिळाली.या मतदारसंघातून १३ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

मात्र, आतापर्यंत लोकसभा असो वा विधानसभा निवडणूक असो धानोरकर कुटूंबियांनी थेट मंत्र्यांना पराभूत केल्याचा इतिहास आहे. विशेष म्हणजे, २०१४ च्या विधानसभा निवडणूकीत स्व.बाळू धानोरकर यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढवितांना तेव्हाचे पालकमंत्री तथा राज्याचे पर्यावरण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा



### मुनगंटीवार लोकसभेत हरण्याची हॅट्रीक

**सुधीर मुनगंटीवार यांनी १९८९ व १९९१ मध्ये लोकसभा निवडणूक लढली आणि हरले.नंतर सहावेळा आमदार म्हणून निवडून आले.तिसऱ्यांदा ते २०२४ लोकसभा निवडणूक लढले आणि हरले.**

काँग्रेस उमेदवार संजय देव-तळे यांचा पराभव केला होता. त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत स्व. खासदार बाळू धानोरकर यांनी थेट केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांना पराभूत केले होते.

मोदी लाटेत राज्यात काँग्रेसचे एकमेव खासदार म्हणून बाळू धानोरकर निवडून आले. तसेच विधानसभा निवडणूकीत वरोरा मतदार संघात आमदार प्रतिभा धानोरकर यांनी माजी मंत्री संजय देवतळे यांचा पराभव करीत निवडून आल्या आहेत. तर आता २०२४ च्याा लोकसभा निवडणुकीत आ. प्रतिभा धानोरकर यांनी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री, मत्स्यव्यवसाय तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यावर २ लाख ६० हजार ४०६ मतांची आघाडी घेत विजयी मार्ग सुकर केला आहे. त्यामुळे धानोरकर कुटूंबियांनी मंत्र्यांना पराभूत केल्याची हॅट्रीक साधली जात आहे. स्व.बाळू धानोरकर व आ. प्रतिभा धानोरकर कुटूंबियांनी लोकसभा व विधानसभा निवडणूकीत मंत्र्यांचा पराभव केल्याचा इतिहास या विजयाने कायम राखल्या गेल्याचे मत आ. प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले.